( /11)

**महत्वाचे**

**तातडीचे**

क्र.पआका/का-१//अ.म./सुरक्षितता/का प / २००७/जा क

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : **21 JUN 2007**

प्रति,

**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**सर्व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,**

**विषय** :-कार्यालयात महसुली जमा होणा-या रोख रकमेच्या सुरक्षेबाबत ध्यावयाची दक्षता.

आपले कार्यालयात मुख्य जमा लेखाशीर्ष ००४१ व ००४२ खाली वाहन कर व शुल्क यासाठी रोखीने रकमा मोठया प्रमाणात जमा होत असतात. सदर रकमेची अफरातफर होऊ नये तसेच शासकीय जमा रकमेची हानी होऊ नये, यासाठी सर्व कार्यालय प्रमुखांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

महसुली जमा रकमा ज्या तिजोरीत ठेवण्यात येतात ज्या तिजोरीच्या चाव्यांच्या संरक्षणाबाबत "Accounts Auditing and Internal Checking (M.V. Department) Chapter V - Custody Of Cash" च्या नियम क. ४० ते ४३ नुसार(प्रत सोबत जोडली आहे) तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ८ व मुंबई वित्तिय नियम, १९५९ च्या नियम ९ व ६० अन्वये कार्यवाही होणे क्रमप्राप्त आहे.

कार्यालय प्रमुखांकडून उपरोक्त नियमानुसार कार्यवाही होते किंवा नाही याची नव्याने शहानिशा होणे आवश्यकआहे जेणे करुन जमा रकमेच्या असुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊन जमा रकमेच्या अपहाराची प्रकरणे उद्भवण्याचे टाळता येईल. तरी आपण उपरोक्त नियमांचे तंतोतंत पालन करुन जमा महसूलाच्या सुरक्षिततेची दक्षता घ्यावी असे आपणास सूचित करण्यात येत आहे.

सहपत्र :-वरीलप्रमाणे

**उप आयुक्त (लेखा)**
परिवहन आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

उप परिवहन आयुक्त (प्रशासन), परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे माहितीसाठी

क्र.२००७/पआ/का.१०/वीजबचत/२००८/जाक्र.३६८

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत,३रा व ४था मजला,
सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०००५१.
दि. 12 JAN 2009

**प्रति**
सर्व नियंत्रक अधिकारी व
सर्व कार्यासन अधिकारी
परिवहन आयुक्त कार्यालय,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

**विषय:** कार्यालयात वीजेचा अनावश्यक वापर टाळण्याबाबत

**संदर्भ :** १) कार्यालयीन परिपत्रक क्र. पआका/का.१०/वीजबचत/२००५-२००६/
जा.क्र.७३७३ दि.२६.०५.२००५
२) समक्रमांकाचे परिपत्रक जा.क्र.१३०८७ दि.१८.१०.२००५

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कार्यालयीन कामकाजाच्या वेळात वीजेचा अनावश्यक वापर टाळून कमीतकमी २० टक्के वीज बचत करण्याबाबत शासनाकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने संदर्भीय परिपत्रकानुसारे आवश्यक सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

तथापि अद्यापही वीजेचा आवश्यक तितकाच वापर करुन वीज बचत करण्यात योग्य ते प्रयत्न करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्गास याद्वारे पुन्हा सूचित करण्यात येते की, वीजेचा अनावश्यक वापर टाळण्याच्यादृष्टीने कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी जागेवर नसताना पंखे, टयुबलाईट व वातानुकुलन यंत्र (ए.सी.) सुरु ठेवू नयेत. याबाबत कार्यासन अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

**परिवहन उप आयुक्त(प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

D:\Sawant\letters

क्र. पआका/का.१०/संकीर्ण/२००१/जा.क्र. १ ७१ ।।८ २०१८

परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत,४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,
सरकारी वसाहत,वांद्रे(पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
दिनांक :- ७-५-२००१

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

---

विषय :- वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबविणे बाबत.

आपणास माहितच आहे की वाढत्या शहरीकरणामुळे शहरी भागात तसेच रस्ते विकास व इतर सुधारणात्मक कामांसाठी ग्रामीण भागात वृक्ष (जंगल) तोडणी सुरु आहे. जंगलांची संख्या कमी झाल्यामुळे जमिनीची धूप होऊन निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे. निसर्गाचा समतोल कायम राखण्यासाठी आपल्या कार्यालयाच्या परिसरामध्ये तसेच आपल्या अधिपत्याखालील सिमा तपासणी नाक्यांच्या परिसरामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात यावा. वृक्ष संवर्धनासाठी अशासकीय संस्था (N.G.O's) , सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका / नगरपालिका इत्यादींकडून वृक्ष संवर्धक (Tree Gaurd ) खरेदी करण्यासाठी सहकार्य घेण्यात यावे.

वृक्षारोपणाचा कार्यक्रम येत्या तीन आठवड्यात पूर्ण करण्यात यावा. प्रत्येक कार्यालयाने केलेल्या कामाचा आगामी पी. एम. आर. बैठकीत आढावा घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७५

# परिपत्रक

**विषय : परिवहन आयुक्त कार्यालयातील अभिलेख्यांचे पुनर्विलोकन करुन अनावश्यक नस्त्या व कागदपत्रांचे निंदणीकरण करण्याबाबत.**

परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिका-यांची दि.७.१०.२००८ रोजी बैठक घेऊन त्यांच्या कार्यासनातील सर्व नस्त्यांचे पुनर्विलोकन करुन अनावश्यक नस्त्या व कागदपत्रे दि.१८.१०.२००८ रोजी विहित पध्दतीनुसार वेगळया करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सर्व कार्यासन अधिका-यांना निर्देशित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीप्रमाणेकार्यासनातील सर्व नस्त्यांची वर्गवारी करुन अनावश्यक व कालबाहय नस्त्या व कागदपत्रे यांची यादी (३ प्रतीत) त्यांच्या नियंत्रण अधिका-याच्या स्वाक्षरीने तयार करुन त्याची एक प्रत (कार्यासन-७) व (कार्यासन-१०) यांना देण्यात यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे कालबाहय ठरलेल्या नस्त्या एकत्रितपणे बांधून त्यावर कार्यासन क्रमांक व विषय व इत्यादी माहिती नमूद करुन अभिलेख कक्षामध्ये ठेवण्यात यावेत. वरील कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी रचना व कार्यपध्दती अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

सर्व कार्यासनांनी वरील नमूद केलेली कार्यवाही दि.१८.१०.२००८ रोजी पूर्ण करावी.

सोबत :वरीलप्रमाणे

(स्वाक्षरी)
**परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई**

क्र.सर्कोर्ण/पआका/निदणी/का १०/२००८/जाक्र.९३३६४
**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत,३रा व ४था मजला,
सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०००५१.
दि. 16 OCT 2008

प्रति : १.रचना व कार्यपध्दती अधिकारी (कार्यासन-१०)
२.सर्व कार्यासन अधिकारी (कार्यासन क.१ ते १९)

*

**परिवहन आयुक्त कार्यालयात दुसरे फॅक्स मशीन दूरध्वनी क्र.०२२-२६४५१४२३ वर कार्यान्वित झालेबाबत.**

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

.परिपत्रक क्र. १/पआका/का.क्र.दहा/फॅक्स मशीन/२००९/जाक्र. 383 दिनांक 12 JAN 2009

## परिपत्रक

परिवहन आयुक्त कार्यालयात मा.अप्पर परिवहन आयुक्त यांचे कक्षासमोर दुसरे फॅक्स मशीन कार्यान्वित करण्यात आले असून कार्यालयातील फॅक्स क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.

१. (०२२) २६४१४९०१
२. (०२२) २६४५१४२३

तरी, वरीलबाबत नोंद घेण्यात यावी.

**परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत : १.मा.परिवहन आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक
२.मा.अप्पर/सह परिवहन आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक
३.सर्व नियंत्रक अधिकारी,परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
४.सर्व कार्यासन अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
५.सर्व स्वीय सहाय्यक
६.सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

**परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

D:\suvarna\paripratak